असं मला म्हणायचं की–

# "स्त्री-मुक्ती"

सुरेखा वाकदकर

स्त्री-मुक्ती या शब्दाचा अर्थ प्रत्येक स्त्रीगणिक वेगळा आहे. उच्च वर्गातल्या स्त्रियांना या शब्दाची माहिती असली तरी ज्ञान नाही. मध्यम वर्गातल्या स्त्रिया काही अपवाद वगळता या चळवळीबद्दलचे मूर्त स्वप्न मनात सतत बाळगून आहेत. तर कनिष्ठ वर्गातल्या स्त्रियांपर्यंत हा शब्द पोचूच शकला नाही.

मी स्वत: मध्यमवर्गीय आदर्श गृहिणी असा माझा समज आहे. शिक्षण बी.कॉम. असूनही आर्थिक दृष्टया स्वतंत्र नाही. वर्तमानपत्रे, मासिके व आजूबाजूचे जग डोळे उघडे ठेवून पहाताना या संबंधात विचार व वास्तव किती भिन्न आहेत हे कळून येते.

स्त्री-मुक्तिला पहिला अडथळा म्हणजे स्त्रीचे स्वत:चेच स्त्रीत्व. हे स्त्रीत्व 'बलात्कार' या शब्दाने इतके धास्तावले गेले आहे की मुलीच्या जन्मानंतर केवळ वरच्या शब्दासाठीच मातेला तिच्या जन्माचे दु:ख व्हावे असे वाटण्याची पाळी आली आहे. रोजच्या पेपरमधल्या बातम्या पाहता ७ वर्षाच्या बालिकेपासून सत्तरीच्या म्हातारीपर्यंत यापासून कोणाची सुटका नाही असे दिसते. हरिजन स्त्रियांवरचे अत्याचार फक्त भीषण या सदरातच जमा होतात. बलात्कार केवळ शारिरीक होत नाहीत तर मानसिकही. पै पै जमवून हौसेने केलेले दागिने जेव्हा एका क्षणात गमावण्याची पाळी येते तेव्हा स्त्रीला केवढा मानसिक धक्का बसलेला असतो याची कल्पनाच करता येत नाही. 'जान बची लाखो पाए' हे खरं असले तरीही हा धक्का प्रचंड असतो. ही वस्तुस्थिती आहे. याविरुद्ध उपाय म्हणजे आमचे सरकार दागिने वापरू नका अशी पत्रके छापते. पण वाढत्या गुंडगिरीला आळा घालू शकत नाही. स्वतंत्र भारतातले स्त्रीचे संचार स्वातंत्र्य तिच्या मुक्तपणाविषयी शंका उत्पन्न करते.

या कुठल्या स्त्रियांना मुक्ती नको आहे? 'स्वैपाकपाणी, कर कालच्याबाणी' करणाऱ्या स्त्रिला स्वत:चे अस्तित्व जाणवून देण्यासाठी मुक्ति हवी आहे. मग ती महिलामंडळाच्या मागे धावते. चार ओळखी झाल्या की खूप झाले. स्वातंत्र्य म्हणून त्याच साखळ्या गळयात अडकवून घेतेय. तिला या संकुचित विश्वापासून निराळया जगात डोकवायचे आहे.

नोकरी करणाऱ्या श्रमिक स्त्रीला घरचा बाहेरचा गाडा उपसता–उपसता दमछाक तर होतेच आहे पण घरीदारी होणाऱ्या अन्यायाच्या घटनांना मनोमन प्रतिकार करावा वाटत असूनही तिचे हात बांधले गेले आहेत. दगडाखाली हात सापडला आहे. पण दगड तर हलवता येतच नाहीय. हळूहळू हातच बधिर होतो आहे.

उच्च वर्गातल्या स्त्रियांचे वर्णन याहून वगळे होणार नाही. मुक्त लैंगिक स्वातंत्र्यातच त्यांना स्त्रीमुक्ति सापडली असावी की काय इतपत त्यांच्या नीति-अनितिच्या कल्पना ढासळलेल्या आहेत. काही सुजाण स्त्रियांचा अपवाद वगळता याही स्त्रियांची अवस्थाही केविलवाणीच आहे. आर्थिक स्वातंत्र्य पैसा खर्च करण्याचे स्वातंत्र्य असले तरी तो कशाप्रकारे खर्च करावा यावर सूचना–उपसूचना असतातच. एवढेच नव्हे तर वागावे कसे, बोलावे कसे यावरही बंधने आहेत. स्वत:चे मन ज्या बोलून मोकळे करू शकत नाहीत, मुक्त करू शकत नाहीत. त्यांच्यापासून स्त्री-मुक्तीची अपेक्षा कोण करणार?

लैंगिक शिक्षणही स्त्री-मुक्तिच्या संदर्भात आवश्यक आहे. रतिसुखाने धुंद स्त्रिया फारच विरळा. जो होतो तो जुलमाचा रामराम किंवा एक काम उरकले अशा प्रकारचे सुख स्त्रियांना मिळत रहाते. काही खुळचट कल्पनांना बळी पडून अशा परिस्थितीत गंडेदोरे, उपासतापास, पुत्रप्राप्तीसाठी योजिले जातात. स्वत: स्त्री असूनही जर मुलगी जन्माला आली तर अतीव दु:ख मानणाऱ्या स्त्रियाही याच जातीच्या. स्वत:च्या जन्माची लाज ज्यांना वाटते त्या काय स्वत:ची मुक्ति करून घेणार? स्वत:च्या जन्माचे सार्थकत्व शोधणार?

केवळ समाजातच स्त्रीवर अन्याय होतो असे नाही तर कुटुंबातही तिच्यावर अन्याय होतो. यासाठी दहा

माणसांचे कुटुंब हवे असे नाही तर 'हम दो हमारे दो' चे चौकोनी कुटुंब असले तरी रात्रीचे शिळेपाके स्वतःसाठी राखून ठेवणारी गृहिणी स्वतःवर अन्यायच करून घेते. असे करण्याचे कारण आपण काय बायकाच, खाऊ शिळे. त्यांना कामावर जावे लागते, खाऊ दे चांगलं-चुगलं. मग कालवण असो वा नसो. वस्तुतः सर्वांनी मिळून शिळे खाण्याचा व भांड्यातला पदार्थ मागून जेवणाऱ्या स्त्रीसाठी राखून ठेवण्याचा पोक्त विचार पुरुषाने केल्यास काही बिघडणार नाही किंवा स्त्री जरी तसे वागली तरी नावे ठेवण्यास कोणी धजावू शकणार नाही. पण लक्षात कोण घेतो ?

मी ह्या छोट्या गोष्टी मुद्दाम सांगते आहे, कारण एक तर त्या रोजच्या तुमच्या-आमच्या जीवनातल्या आहेत. छोटे-छोटे गुन्हे करूनच जसा पुढे मोठा गुन्हेगार निर्माण होतो त्याप्रमाणेच छोट्या अन्यायाकडे दुर्लक्ष करून मनाला अन्याय सहन करण्याची शिकवण पुढे मोठ्या अन्यायांनाही वाचा फोडू देत नाही. याचेच नुकतेच उदाहरण म्हणजे स्त्री-मुक्ति विषयक प्रश्नांपैकी हुंडा समस्येवरचे छोटेसे नाटक सादर करण्यासाठी एका प्रसिद्ध महिला महाविद्यालयाच्या (बनारस हिंदू विश्वविद्यालय) महिला प्राचार्यांनी परवानगी नाकारली. एवढेच नव्हे तर स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीला कधीच येऊ शकणार नाही. नव्हे त्यांनी तसा प्रयत्न करणे हा देखील गुन्हा आहे असे दिव्य (!) वक्तव्यही जोडले. धन्य ती स्त्री-मुक्ति.

स्त्रीच्या बाबतीत चालून येणारे मातृत्वही स्त्रीच्या व्यक्तिगत विकासात अडथळाच आहे, असे मानण्यात येते. जोपर्यंत सुसज्ज पाळणाघरे, बालवाड्या समृद्ध प्रमाणावर दिसू शकत नाहीत, तोपर्यंत स्त्रीला या बेडीला पायात अडकवूनच पुढचा मार्ग चालावा लागणार आहे. याही बाबतीत पुरुषवर्ग जर थोडे फार सहकार्य करील तर मार्ग निघू शकेल. ऑफिसच्या किंवा धंद्याच्या व्यापामध्ये सलग एक तास तरी आपण आपली मुले सांभाळू शकतो का हा पुरुषांनी स्वतःच्याच मनाला प्रांजलपणे प्रश्न विचारावा. फक्त कौतुकाने एखादा पापा घेतला नि एखादे गोड चॉकलेट हातावर ठेवले की संपले आपले कर्तव्य. मग जर स्वतःच्या पेपरवाचनात किंवा कामात जर मुलाचा अडथळा होऊ लागला तर जा रे आईकडे असे उलट सांगणार.

केवळ घरकामातून सुटका किंवा बालसंगोपनातून सुटका यातून विरंगुळा शोधण्याचा वेळ म्हणजे स्त्री मुक्ति नव्हे तर प्रत्येक बाबतीत तिचे मत किती प्रमाणात विचारात घेतले जाते याची तपासणी करायला हवी. साधी मिरची, कोथिंबीर घेतानाही पैसे द्या हो असे म्हणणाऱ्या स्त्रीस पतिव्रता म्हणावे की बावळट ? तिच्यापर्यंतही स्त्री-मुक्ति हा शब्द अर्थासकट पोचायला हवा.

पुरुष म्हणजे नवऱ्यांच्या भूमिकेत असलेले पुरुष ज्या मर्यादित दृष्टिकोनातून आपल्या स्वतःच्या आई, बहीण किंवा बायकोकडे पहातात त्याहून अगदी वेगळ्या दृष्टीने इतर स्त्रियांकडे त्यांचे लक्ष असते. या गोष्टीला खतपाणी घालतात भडक रंगचित्रे, पोस्टर्स, जाहिराती स्त्रीच्या आवश्यक बाबींविषयीच्या जाहिरातीत सुद्धा जेव्हा तिचे दर्शन होते तेव्हा ते हास्यास्पद ठरते. धंदेवाईक दृष्टिकोन ठेवून मग स्त्री देहाचे वाटेल तसे उघडे नागडे प्रदर्शन करण्यात 'कमर्शियल आर्ट' कमी पडत नाही. स्त्रीकडे तिचा स्त्री देह म्हणून पहाण्याची जी भूमिका इतर पुरुषांची असते तिला तर यातून प्रोत्साहनच मिळते. पण सर्वात जास्त विटंबना स्त्री देहाची यथार्थाने स्त्रीचीच असते. अशा भडक जाहिराती, नाटके यापासून स्त्रीमुक्ति व्हावयास हवी या माझ्या मुद्याचा कोणी गंभीरपणे विचार करणार नाही. कारण मुक्त समाजाच्या कल्पनेने भारावलेले काही लोक आहेत. तर व्यक्ति स्वातंत्र्याच्या कल्पनेचा पुरस्कार करणारे धंदेवाईक हा प्रश्न हाणून पाडतील. तसेच कालमानानुसार बदलत जाणाऱ्या निती अनितीच्या कल्पना व व्यावहारिक जग वाढतंय विकसतंय.

स्त्री मुक्तिच्या चळवळीत ज्यांचा अवश्य समावेश करावा लागेल असा वर्ग आहे देहविक्रय करणाऱ्या स्त्रियांचा. त्यांच्यावरील अन्याय जरी दूर झाले तरी स्त्री-मुक्तिची एक पायरी गाठल्याचे समाधान आपल्याला होईल. तेव्हा गृहिणींनो, स्त्रियांनो, मातांनो, भगिनींनो निघा आता घरातून करा गर्जना—

या देशाच्या बायांना-आया बहिणींना
सांगाय जायाचं हाय गं !
एकी करून आणि लढा पुकारून
हे तुरुंग फोडायचं हाय गं !

पण प्रत्येक क्रांतीची सुरवात स्वतःच्या घरापासून करायची असते हे विसरू नका.